**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमधील अंशकालीन निदेशकांच्या मानधनासाठी राज्य हिस्स्याचा निधी वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- न्यायाप्र २०२५/प्र. क्र. ७९ (ई-११२७२४२)/ एसडी-१**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ मार्च २०२६.

**वाचा :-**

१) राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र, क्र. मप्राशिप/सशि/ अं.नि./ २०२५-२६/ २३२, दि. २०.०१.२०२६.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. पूरक २०२५/ प्र. क्र. ८२ (ई-११५०७५६), दि. २०.१०.२०२५.
३) राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र, क्र. मप्राशिप/सशि/ अं.नि./ २०२५-२६/ २८९५, दि.२५.०९.२०२५.
४) राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र, क्र. मप्राशिप/सशि/ अं.नि./ २०२५-२६/ २४९३, दि.१२.०८.२०२५.
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय समक्रमांक, दि. ०५.०६.२०२५.
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५.
७) शासन परिपत्रक, क्र. आरटीई २०२१/ प्र. क्र. ३०/ एसडी-१, दि.१४.१०.२०२४.
८) शासन पत्र, क्र. आरटीई २०२१/ प्र. क्र. ३०/ एसडी-१, दि.२८.०६.२०२४, दि. १६.०७.२०२४ व दि.१९.०७.२०२४.

**प्रस्तावना :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ८७८६/२०२१ प्रकरणी दि. ०२.०४.२०२४ व दि.०८.०५.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशांनुसार न्यायालयीन प्रकरणात सहभागी असलेले व न्यायालयीन प्रकरणाबाहेरील अंशकालीन निदेशकांना मानधन अदा करण्यासंदर्भात शासन निर्णय, दि. ०५.०६.२०२५ अन्वये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे.

२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी संदर्भ क्र. १ अन्वये शासनास सादर केल्यानुसार गडचिरोली व छत्रपती संभाजी नगर येथिल अंशकालीन निदेशकांच्या मानधनाची रक्कम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाच्या स्तरावरून वितरित करण्यात आली होती. तथापि, तांत्रिक अडचणींमुळे अंशकालीन निदेशकांना मानधन अदा करता आले नाही. याकरिता अंशकालीन निदेशकांच्या मानधनाकरिता आवश्यक असणारा रु. ३,९८,७०२/- इतका निधी "मागणी क्र. ई-२, (२२०२ आय ६१२), ३१-सहायक अनुदाने (राज्य हिस्सा ४० टक्के)" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असणाऱ्या निधीतून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये रुजू झालेल्या तसेच, तांत्रिक कारणास्तव मानधन अदा न झालेल्या अंशकालीन निदेशकांचे मानधन अदा करण्यासाठी रु. ३,९८,७०२/- (रुपये- तीन लाख अठ्ठ्याण्णव हजार सातशे दोन फक्त.) इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक परिषद, मुंबई यांना वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. अंशकालीन निदेशकांच्या मानधनाची रक्कम त्यांच्या बँक खात्यातच जमा करावी. याबाबत कोणतीही अनियमितता होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३. कार्यरत अंशकालीन निदेशकांचे मानधन अदा केल्यानंतर निधी शिल्लक राहिल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. शिल्लक निधीचा विनियोग करण्यापूर्वी शासनाची पूर्वमान्यता घेण्यात यावी. वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र एक महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करावे.

४. सदर खर्च "मागणी क्र. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६-शिक्षक व इतर सेवा, (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२ आय ६१२) (कार्यक्रम), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदर निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधी आहरित करून वितरित करण्यासाठी अवर सचिव/ कक्ष अधिकारी (रोख शाखा/ लेखा शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना “आहरण व संवितरण अधिकारी" तर सह सचिव/ उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी निधी कोषागारातून आहरित करुन समग्र शिक्षा योजनेच्या SNA खात्यात जमा करावा. सदर निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी जिल्हा परिषद/ महानगरपालिकानिहाय वितरित करावा. वितरित केलेल्या निधीचा तपशिल शासनास सादर करावा.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.०७.०४.२०२५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता होत आहे. सदरचे अनुदान सशर्त अनुदान असून त्याकरिताच्या अटी व शर्ती या शासन निर्णयात नमूद केल्या आहेत.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ई-११२७२४२,अनौ.सं-२३८/व्यय-५, दि.२५.०३.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३११९२३२७९८२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA
AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB30089069836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.03.31 19:24:18 +05'30'

**(अ. अ. कुलकर्णी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष / सभापती, विधान सभा / विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास)/ मा. उप मुख्यमंत्री (अल्पसंख्यांक व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व).
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा / विधान परिषद, विधान भवन, मुंबई

७. मा. विधान सभा / विधान परिषद, विधान भवन, मुंबई (सर्व)
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर.
१५.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१७.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३.
१८.सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग).
१९. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२०. उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-५/ अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
२१. उप सचिव (एसडी/ प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.उप सचिव (१४७१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. अवर सचिव/ कक्ष अधिकारी, लेखाशाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५.निवड नस्ती (एसडी-१).